## संक्षिप्त वृत्त



परंडा : बावची विद्यालयात वसंतराव काळे यांना अभिवादन करताना शिक्षकवृंद.

### बावची विद्यालयात वसंतराव काळे यांना अभिवादन

परंडा : बावची विद्यालय, परंडा व वसंतराव शंकरराव काळे कनिष्ठ महाविद्यालय, परंडा येथे स्व. शिक्षक आमदार वसंतराव शंकरराव काळे यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी वसंतराव शंकरराव काळे यांच्या प्रतिमेचे पूजन सचिन मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमात स्व. वसंतराव काळे यांचे शिक्षण क्षेत्रातील भरीव योगदान, त्यांचे सामाजिक व शैक्षणिक कार्य याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. स्मृतिदिनाचे औचित्य साधून विद्यालयात निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. निबंध स्पर्धेचे निकाल पुढीलप्रमाणे जाहीर करण्यात आले. यात प्रथम क्रमांक सिद्धी सचिन गरड (इ. ८ वी), द्वितीय क्रमांक : सृष्टी विजय लिमकर (इ. ७ वी), तृतीय क्रमांक : दिक्षा केशव यादव (इ. ९ वी) यांनी पटकावला. या कार्यक्रमास विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# सोलापूर जनता बँकेकडून १६ कोटींच्या गृहकर्जाला प्राथमिक मंजुरी

## क्रेडाई प्रॉपर्टी एक्सपो मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रविणसिंह परदेशी यांची भेट

सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर जनता सहकारी बँकेकडून तब्बल १५ कोटी ७५ लाख रुपयांच्या गृहकर्जांना प्राथमिक मंजुरी देण्यात आली. नुकत्याच झालेल्या क्रेडाई एक्सपोमध्ये मुख्य प्रयोजक असलेल्या सोलापूर जनता सहकारी बँकेने ग्राहकांना जागेवरच गृहकर्जाचे प्राथमिक मंजुरी असलेले कर्जमंजुरी पत्र प्रदान केले.



सोलापूर : क्रेडाई प्रॉपर्टी एक्सपोला मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रविणसिंह परदेशी यांनी भेट दिली. यावेळी सुनील पेंडसे, विजय दुनाखे व मान्यवर.

क्रेडाई एक्सपोमध्ये सोलापूर जनता सहकारी बँकेच्या स्टॉलला हजारो सोलापूरकरांनी भेट दिली. यात गृहबांधणी, प्लॉट खरेदी, सदनिका खरेदी बंगला खरेदी याकरिता सोलापूर जनता सहकारी बँकेतर्फे राबविण्यात येणाऱ्या आकर्षक आणि ग्राहकाभिमुख योजनांची माहिती सोलापूर शहर आणि जिल्ह्यातून आलेल्या नागरिकांनी घेतली. क्रेडाई एक्सपोला भेट देण्यासाठी आवाहन करणारा संदेश सोलापूर जनता सहकारी बँकेतर्फे बँकेच्या सर्व ग्राहकांना पाठवण्यात आला होता.

त्यानुसार हजारो ग्राहकांनी क्रेडाईला भेट दिली. यावेळी गृह कर्जासाठी इच्छुक ग्राहकांना जागेवरच कर्ज मंजुरी पत्र देण्यात आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रविणसिंह परदेशी, सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, उपायुक्त आशिष लोकरे, सुधीर थोबडे, नगरसेवक सात्विक बडवे आदींनी सोलापूर जनता सहकारी बँकेच्या स्टॉलला भेट दिली.

प्रविणसिंह परदेशी म्हणाले, सोलापूर जनता सहकारी बँकेने राष्ट्रीय बँकांप्रमाणे कर्ज वितरण केले आहे. गृह कर्जासाठी आकर्षक योजना राबवत सर्वसामान्यांचे घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सोलापूर जनता सहकारी बँकेकडून होणारे प्रयत्न कौतुकास्पद आहेत, असेही परदेशी याप्रसंगी म्हणाले.

यावेळी सोलापूर जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष सुनिल पेंडसे, मुख्य कार्यकारी अधिकारी विनय दुनाखे, सरव्यवस्थापक प्रदीप बुट्टे, उपसरव्यवस्थापक मकरंद जोशी, उपसरव्यवस्थापिका अंजली कुलकर्णी, सहाय्यक सरव्यवस्थापक रमेश मामड्याल, रामदास सिद्धूल, तुळशीदास गज्जाम, मुख्य कार्यालयातील अधिकारी मदन मोरे, अमोल रामनवर उपस्थित होते.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाखा व्यवस्थापक विलास दीक्षित, मल्लिनाथ खूने, मंजिरी फडके, जयप्रकाश नादरगी, माधुरी कुलकर्णी, शैलेजा देशपांडे तसेच बँकेच्या सर्व शाखांचे व्यवस्थापक, कर्ज विभाग व प्लॅनिंग अँड डेव्हलपमेंट विभाग तसेच संगमेश्वर महाविद्यालयाच्या वाणिज्य शाखेच्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनींचे सहकार्य लाभले.

> **कर्जासाठी बँकेच्या शाखेशी संपर्क साधा**
>
> सोलापूरकरांनी आकर्षक व्याजदराच्या प्लॉट खरेदी, गृह कर्जासाठी आणि तत्पर सेवेसाठी सोलापूर जनता बँकेच्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधावा.
>
> **-सुनील पेंडसे,** अध्यक्ष, सोलापूर जनता सहकारी बँक

# ६५ वर्षांवरील माजी सैनिकांसाठी माहिती संकलन

सोलापूर : सोलापूर जिल्ह्यातील माजी सैनिकांच्या व्याख्येत न बसणारे तसेच सैन्यातील निवृत्ती वेतन मिळत नसलेल्या ६५ वर्षांवरील माजी सैनिक व विधवा पत्नी यांची माहिती संकलित करण्यात येणार आहे. संबंधितांनी आपला तपशील दि. १० फेब्रुवारीपर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर येथे सकाळी १० ते सायंकाळी ६ या कार्यालयीन वेळेत समक्ष उपस्थित राहून सादर करावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे. ही माहिती शासनाच्या विविध योजनांचा लाभ गरजू माजी सैनिक व त्यांच्या विधवांपर्यंत पोहोचवण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.



# रस्त्यांचे जाळे विणल्यानेच ग्रामीण भागाचा विकास

## सागर कल्याणशेट्टी यांचे प्रतिपादन : चपळगाव भागात भाजपाची पदयात्रा

अक्कलकोट/प्रतिनिधी

अक्कलकोट तालुक्यातील ग्रामीण भागात गावा-गावांना जोडणारे रस्ते अनेक वर्षांपासून खराब झाले होते. मात्र आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी राज्य व केंद्र शासनाच्या मदतीने चित्र बदलले आणि प्रत्येक गावाला जोडणारे रस्ते पक्के बनवले. यामुळे अक्कलकोटच्या ग्रामीण भागाचा विकास होत असल्याचे चपळगांव पंचायत समितीचे भाजपा उमेदवार सागर सिध्दप्पा कल्याणशेट्टी यांनी म्हटले.

चपळगाव जिल्हा परिषद गटासाठी भाजपाकडून शांभवी सचिन कल्याणशेट्टी तर चपळगाव गणासाठी सागर कल्याणशेट्टी, कुरनूर गणासाठी विनोद मोरे या उमेदवारांचा होम टु होम प्रचार, पदयात्रा, गावभेट दौरे सुरू आहेत.

उमेदवारांकडून चपळगाववाडी, बावकरवाडी, किणी, सिंदखेड, मोट्याळ, बावकरवाडी आदी गावात प्रचार केला. यावेळी ज्येष्ठ नेते सिध्दू कल्याणशेट्टी, उपसभापती अप्पासाहेब पाटील, पूजा कल्याणशेट्टी, बाळासाहेब मोरे, माजी सरपंच उमेश पाटील, महेश पाटील, अभिजित पाटील, दिपक पाटील, बसवराज बाणेगांव, अमोल हिप्परगी, विनोद पवार, प्रताप जाधव, अंकुश जाधव, लक्ष्मण जाधव यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

सागर कल्याणशेट्टी म्हणाले की, चपळगाव मतदारसंघाच्या विकासासाठी कल्याणशेट्टी परिवाराने नेहमीच प्रामाणिक प्रयत्न केले आहेत. मतदारसंघातील प्रत्येक गावचा सर्वांगीण विकास कसा होईल याद्दष्टीने व्हिजन ठेवले आहे. तसेच आगामी काळात शेतकरी हा केंद्रबिंदू मानून शासनाच्या विविध योजना तळागाळापर्यंत पोहचविणार आहे.

# राष्ट्रवादीच्या तिन्ही महिला उमेदवारांना विजयी करुन विकास करण्याची संधी द्या : आमदार खरे


- अश्विनी पाटील, विद्या कोळकुर, मयुरी शेंडगे यांच्या प्रचारार्थ, सावळेश्वरमध्ये प्रचार सभा
- आमदार खरे यांनी राजन पाटलांवर टिका करत मतदारांना केलं आवाहन

विरवडे बु/प्रतिनिधी

मोहोळ तालुक्यातील कामती जिल्हा परिषद गटासह कामती व सावळेश्वर पंचायत समिती गण अशा तिन्ही ठिकाणच्या निवडणुकीमधील लढाई ही धनशक्तीविरुद्ध जनशक्ती अशी होत असून या भागाच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रवादीच्या अश्विनी पाटील, विद्या कोळकुर आणि मयुरी शेंडगे या तिन्ही सक्षम महिला उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन मोहोळ तालुक्याचे आमदार राजू खरे यांनी केले.

कामती गटातील राष्ट्रवादी उमेदवारांच्या प्रचारार्थ, सावळेश्वर येथे आयोजित प्रचार सभेत आमदार खरे बोलत होते.

आमदार खरे पुढे म्हणाले की, कामती भागाच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ आश्वासनावर नव्हे, तर प्रत्यक्ष काम करणारा व जनतेच्या अडचणीला तत्काळ धावून येणाऱ्या आपल्या हक्काचा उमेदवार अश्विनी पाटील यांना जिल्हा परिषदेत तर कामती पंचायत समिती गणाच्या उमदेवार विद्या कोळकुर आणि सावळेश्वर पंचायत समिती गणातून मयुरी शेंडगे यांना मोहोळ पंचायत समितीत भरघोस मते देऊन पाठवा, असे ते म्हणाले.



सावळेश्वर : कामती गट आणि गण तसेच सावळेश्वर गणाच्या राष्ट्रवादी काँग्रेस उमेदवारांच्या प्रचार सभेत बोलताना आमदार राजू खरे.

या वेळी तृप्ती खरे, रमेश बारसकर, नरसिंह पाटील, समाधान शेंडगे, अनिल आवताडे, शशिकांत गावडे, महेश भोसले, बापू तरटे, सर्जेराव पाटील, नारायण निळ, नितीन सोनटके, सुधीर लांडगे, रमेश पवार, जयवंत जाधव, रत्नदीप गायकवाड, पंचायत समितीच्या माजी सभापती समता गावडे तसेच उमेदवार अश्विनी पाटील, मयुरी शेंडगे त्याशिवाय सोनाली पाटील, पल्लवी पाटील, अश्विनी गव्हाणे, सोनाली गव्हाणे, वर्षा पाटील, मनीषा पाटील, रमेश पवार, राजाराम गव्हाणे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> 
>
> “मोहोळ तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीमधील ही लढाई खरी धनशक्तीविरुद्ध जनशक्ती आहे. मोहोळ तालुक्याचा विकास न करता तालुक्याच्या मालकांनी तालुका पूर्ण भकास करून टाकला. त्यामुळे जनता या निवडणुकीत त्यांना दाखवल्याशिवाय राहणार नाही.
>
> – **रमेश बारसकर,** नेते, शिंदेसेना मोहोळ

> **राजन पाटलांनी काय मदत केली?**
>
> येथील सभेत खरे यांनी राजन पाटील यांच्यावर टीका केली. पाटील यांनी ४० वर्षे आपल्या तालुक्यातील जनतेची पिळवणूक केली. तालुक्याचा कोणताही विकास न करता फक्त त्यांनी स्वतःचा विकास करून घेतला. तालुक्यात हुकूमशाहीशिवाय दूसरे काही केले नाही. मात्र. आता आम्ही शांत बसणार नाही. सर्वसामान्य जनतेची कामे करत राहू. अतिवृष्टी आणि सीना नदीला महापूर आल्यावर राजन पाटील यांनी कोणालाही मदत केली नाही, असे आमदार खरे म्हणाले.
>
> **अजितदादांना ९ मंडलांमध्ये नुकसानभरपाई देण्यास भाग पाडले**
>
> आमच्याकडे कारखाना, संस्था वगैरे काहीही नाही. तरीपण य महापुरामध्ये मी जनतेची सेवा केली. महापुराच्या पाण्यामध्ये मोठ्या प्रमाणात नागरिकांचे नुकसान झालेले होते. शासनाने फक्त ६ मंडल नुकसान भरपाई देण्यासाठी घेतले होते. पण महापुरामुळे माझ्या मतदारसंघातील नऊ मंडळामध्ये नुकसान झाले होते, हे मी अजित पवारांना सांगून ९ मंडल नुकसान भरपाईसाठी घ्यायला लावले. त्यामुळे सर्वांना शासनाची मदत मिळाली आहे.




बाळे : वार्षिक स्नेहसंमेलनप्रसंगी दिगंबर ढेपे, तानाजी माने, प्रा. बापूसाहेब अडसूळ आदी मान्यवर.

# ढेपे संकुलाचे वार्षिक स्नेहसंमेलन साजरे

सोलापूर/प्रतिनिधी

विश्वकृपा विद्या प्रतिष्ठान संचलित दिगंबर विश्वनाथ ढेपे हायस्कूल व जय मल्हार प्राथमिक शाळा, बाळे विशाल हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने ढेपे संकुल येथे सोमवार व मंगळवार, दि. २ व ३ फेब्रुवारी २०२६ रोजी वार्षिक स्नेहसंमेलन व वार्षिक पुरस्कार वितरण समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दिगंबर ढेपे होते. प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याध्यापक संघाचे राज्य अध्यक्ष तानाजी माने, एकनाथ स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे प्रदेश अध्यक्ष प्रा. बापूसाहेब अडसूळ, महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीचे जिल्हाध्यक्ष गुरुनाथ वांगीकर, आण्णासाहेब भालशंकर, राजाभाऊ आलुरे, शिवाजी केते, दळवे मालक, यशवंत ढेपे, उज्वला पाटील, विठ्ठल मोरे, सुहास माने, सोमनाथ तोडकरी, बंडोपंत ढेपे, अलका आनंद भवर, ॲड. अमरीश कोल्हे आणि यशवंत राजेंद्र ढेपे उपस्थित होते.

प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर अध्यक्षांच्या हस्ते पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. पाहुण्यांनी मनोगतातून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे कौतुक केले. शाळेच्या विविध उपक्रमांमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांनी गणेश वंदना, ऑपरेशन सिंदूर, सोलापूर जिल्ह्यातील पूर परिस्थितीवर आधारित गीत, विठ्ठल गीत, खंडोबा गीत, छत्रपती संभाजी महाराजांवरील छावा थीम, भक्त प्रल्हाद नरसिंह थीम, सोलापूर दर्शन थीम, गोंधळ गीत तसेच जुन्या मराठी व हिंदी चित्रपट गीतांवर आधारित बहारदार नृत्य सादर केले. या सादरीकरणांना पालकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हा संपूर्ण कार्यक्रम मुख्याध्यापक अमोल ढेपे यांच्या नियोजनाखाली यशस्वीपणे पार पडला. कार्यक्रमाला अश्विनी बिराजदार, नाजनीन सय्यद, भाग्यश्री चराटे, शरदचंद्र वाले, सदाशिव शिंदे, गोविंद पाडवी, रत्नमाला माळी, विद्या चिडगुंपी, सुषमा नागटिळक, मनीषा क्षीरसागर, संघमित्रा वाघमारे आदी शिक्षक उपस्थित होते. सहशिक्षिका राजश्री नीलकंठ आणि सुजाता ढेपे यांनी सूत्रसंचालन केले.

# वागदरी जि. प. गटात धनशक्ती विरुध्द जनशक्तीची लढत

अक्कलकोट/प्रतिनिधी

वागदरी जिल्हा परिषद या गटातील निवडणूक बलाढ्य धनशक्ती विरुद्ध जनशक्ती असून, काँग्रेसचा आवाज अधिक ताकदीने आणि ठामपणे बुलंद करू, असा विश्वास काँग्रेसचे उमेदवार मल्लिकार्जुन हत्ते यांनी व्यक्त केला.



मागील अनेक वर्षे वागदरी जिल्हा परिषद गटातील जनतेसाठी हत्ते यांनी भरपूर काम केलेले आहे. त्यांच्या प्रचारामुळे स्थानिक राजकारणात मोठी चर्चा रंगू लागली आहे. अक्कलकोट पंचायत समितीचे माजी सदस्य म्हणून काम करत असताना मल्लिकार्जुन हत्ते यांनी सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न थेट पंचायत समिती सभागृहात सडेतोड मांडले.

पाणी, शेती, रस्ते, वीज, आरोग्य व शिक्षण यासारख्या मूलभूत प्रश्नांवर त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला असून, त्यांच्या कार्यकाळातील कामांची आजही आठवण काढली जाते. यासोबतच माजी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक म्हणून त्यांनी शेतकरी हिताला सर्वोच्च प्राधान्य दिले. शेतमालाला योग्य दर, बाजार समितीतील पारदर्शक व्यवहार आणि दलालशाहीला आळा घालण्यासाठी त्यांनी ठोस भूमिका घेतली. शेतकऱ्यांच्या अडचणी प्रत्यक्ष अनुभवणारा नेता अशी त्यांची ओळख तालुक्यात निर्माण झाली आहे. गावपातळीवरील अनेक सामाजिक उपक्रमांमुळे त्यांचा जनसंपर्क अधिक दृढ झाला आहे.

> “या निवडणुकीत आपण आणि सहकारी मौलाली पठाण यांनी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार रिंगणात उतरवले असून, खासदार प्रणितीताई शिंदे, मल्लिकार्जुन पाटील, सुवर्णा मलगोंडा यांचे मार्गदर्शन लाभत आहे. वागदरी हा काँग्रेसचा बालेकिल्ला असून आम्ही अधिक ताकदीने ही लढाई लढवून निश्चित विजय मिळवू.
>
> – **सतीश कल्याणी पालापुरे** माजी अध्यक्ष, विद्यार्थी काँग्रेस

स्वच्छ प्रतिमा आणि संघटनात्मक ताकद असलेला नेता म्हणून मल्लिकार्जुन हत्ते यांचे नाव अग्रेसर काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये आणि नागरिकांमध्येही विश्वासाने घेतले जात आहे. काँग्रेसचे विचार, संविधानिक मूल्ये आणि तळागाळातील जनतेचा आवाज व अनुभव जिल्हा परिषदेत ताकदीने मांडण्याची माझी तयारी आहे, व मी शंभर टक्के निवडून येणारच असा विश्वास हत्ते यांनी व्यक्त केला.

### उमेदवार मल्लिकार्जुन हत्ते यांचे प्रतिपादन

माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे व खासदार प्रणितीताई शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हत्ते यांनी वागदरी जिल्हा परिषद गटात झंझावाती दौरा सुरू केला आहे.

या प्रचार दौऱ्यात घोळसगावचे युवा नेता सतिश पालापुरे, बोरगाव देशमुखचे अल्पसंख्याक तालुकाध्यक्ष मौलाली पठाण, खाशिम बिराजदार, अल्ताफ फकीर आदींसह युवक वर्ग मोठ्या संख्येने सहभागी आहेत.